**ज्ञान प्रबोधिनी प्रशाला**
**५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**
**इयत्ता ५वी (२०२२-२३)**

---

1. सोबतच्या यादीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींची इयत्ता ५वीतील प्रवेशासाठी त्यांच्या गुणवत्तेनुसार निवड झाली आहे. मात्र प्रवेश घेतेवेळी सांगितलेल्या नियमांपेक्षा वेगळी वैयक्तिक माहिती आढळल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

2. दि. २८ मार्च ते दि. ९ एप्रिल २०२२ या दरम्यान प्रशाला कार्यालयात अर्ज भरावा. अर्ज भरल्यानंतर आपल्या मोबाईलवर एस.एम.एस.ने दोन लॉग इन आय.डी. आणि पासवर्ड येतील. एक विद्यार्थ्यांसाठी व एक पालकांसाठी. jpp.etechschoolonline.com या संकेतस्थळावर पालकांच्या लॉगीन आय.डी. ने लॉग इन करून शुल्क रुपये ८५,०००/- भरावे. शुल्क भरल्यानंतर आपल्या पाल्याचा प्रवेश फक्त राखून ठेवला जाईल. दि. १ मे २०२२ पर्यंत पाल्याच्या इ. ४थीच्या गुणपत्राची, आधारकार्डाची छायामुद्रित प्रत, आधीची शाळा सोडल्याचा मूळ दाखला व एक प्रकाशचित्र असे कार्यालयात द्यावे. त्यानंतरच प्रवेश अंतिमरित्या निश्चित होईल.

3. प्रवेशासाठी कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे असतील-

   सोमवार ते शुक्रवार सकाळी ११.३० ते ४.३० व शनिवारी सकाळी ८.३० ते १२.०० अशी आहे.

4. निवड झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दि. ९ एप्रिल २०२२ पूर्वी प्रवेश न घेतल्यास दि. ११ एप्रिलपासून जशा जागा रिकाम्या असतील त्याप्रमाणे प्रतीक्षा यादीवरील विद्यार्थी- विद्यार्थिनींना क्रमश: प्रवेश दिला जाईल.

5. शाळेच्या नियमांविषयी व गणवेशाविषयी सूचना प्रशाला कार्यालयात मिळतील.

6. परगावच्या ज्या विद्यार्थ्यांना सहनिवासात प्रवेश घ्यायचा आहे त्यांनी सहनिवासाचा स्वतंत्र अर्ज प्रशाला कार्यालयातून घेऊन जावा. तो दि. ५ एप्रिलपूर्वी प्रशाला कार्यालयात जमा करावा. सन २०२२-२०२३ या वर्षासाठी वार्षिक सहनिवास शुल्क रुपये ५०,०००/- आहे. ते दोन हप्त्यांत भरता येईल. अर्ज दिल्यानंतरच सहनिवास शुल्क प्रशालेच्या संकेतस्थळावरून भरता येईल. यंदाच्या वर्षी सहनिवासात पाच जागा शिल्लक असून सोबतच्या यादीतील प्राधान्यक्रमाप्रमाणेच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

7. **रविवार दि. २७ मार्च रोजी सकाळी ९.०० वा. प्रवेशासंबंधी एक पालक-बैठक योजली आहे. त्यास सर्वांनी उपस्थित राहावे.**

8. **इ. ५वीची शाळा सोमवार दि. १३ जून २०२२ रोजी सुरू होईल.**

(प्रा. मिलिंद नाईक)
प्राचार्य